<u>अपंग एकात्मिक शिक्षण योजना अंतर्गत विशेष शिक्षक/परिचर यांच्या समायोजनामध्ये झालेल्या गैरप्रकाराची चौकशी करण्यासाठी विशेष चौकशी पथकाची (SIT) स्थापना करणेबाबत....</u>

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसटीएफ़-१०१८/प्र.क्र.७६/टिएनटी-५

मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई-४०००३२

तारीख: २१ मे, २०१८.

<u>वाचा :-</u>

1. **शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक : पीआरई-२००९/प्र.क्र. ३०१/प्राशि-१, दिनांक १५ सप्टेंबर, २०१०**

<u>प्रस्तावना :-</u>

सन २००९-१० पासून अपंग एकात्म शिक्षण योजनेऐवजी केंद्र शासनाने अपंग समावेशित शिक्षण योजना (माध्यमिक स्तर) (Inclusive Education For Disable Children at Secondary Stage) अशी नवीन योजना राबविण्याचे ठरविले. तसेच अपंग एकात्म शिक्षण योजना प्राथमिक स्तर (Integrated Education for Disable Children) योजना केंद्र शासनाने बंद केल्यामुळे या योजनेतील कार्यरत युनिटवरील ५९५ विशेष शिक्षकांना प्राथमिक शाळेमध्ये शिक्षक पदावर संदर्भाधीन दिनांक १५ सप्टेंबर, २०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार सामावून घेण्यात आले .

२. माहे जानेवारी २०१८ व त्यासुमारास उपरोक्त दिनांक १५.०९.२०१० च्या शासन निर्णयान्वये विशेष शिक्षक/परिचर यांचे समायोजन करण्याबाबत शासनाच्या बोगस/खोट्या पत्रांच्या आधारे नियुक्त्या देण्याबाबतचा प्रकार काही जिल्हा परिषदांमध्ये उघडकीस आला आहे. तथापि, सदर बोगस/खोट्या पत्रांच्या आधारे नियुक्ती देण्याबाबतचा प्रकार राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये देखील घडला असण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने सदर प्रकरणाची विशेष तपासणी पथकामार्फ़त सखोल चौकशी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

दिनांक १५.०९.२०१० च्या शासन निर्णयान्वये विशेष शिक्षक/परिचर यांचे समायोजन प्रक्रियेमध्ये अनियमितता झाली आहे किंवा कसे याची सखोल चौकशी करण्यासाठी खालीलप्रमाणे विशेष चौकशी पथकाची स्थापना करण्यात येत आहे :-

अ) रचना :-

अ.क्र.	सदस्याचे नाव	पद
१.	श्री. विशाल सोलंकी, आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य	अध्यक्ष/पथक प्रमुख
२.	श्री. जय जाधव, पोलीस उप महानिरिक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, सी. आय. डी	सदस्य
३.	श्री. गिरीश भालेराव, उपसचिव, ग्राम विकास विभाग	सदस्य
४.	श्री. श्रीधर शिंत्रे, प्रशासन अधिकारी, आयुक्त (शिक्षण) कार्यालय	सदस्य सचिव

ब) कार्यकक्षा :-

१. राज्यातील विविध जिल्ह्यामध्ये शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, दिनांक १५.०९.२०१० च्या आधारे शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून प्रत्यक्ष समायोजन करणे अपेक्षित असलेल्या ५९५ विशेष शिक्षक व ३२ परिचर यांची यादी सादर करावी व त्यापैकी नेमक्या कोण-कोणत्या विशेष शिक्षक/परिचर यांचे अद्याप पर्यंत प्रत्यक्षात समायोजन करण्यात आले व किती विशेष शिक्षक/परिचर यांचे समायोजन होणे प्रलंबित आहे त्यांची माहिती उपलब्ध करुन देणे.

२. समायोजनामध्ये कुठल्याही प्रकारचा गैरव्यवहार/अनियमितता झाली आहे किंवा कसे याबाबत चौकशी करणे. अनियमिततेमुळे झालेल्या विशेष शिक्षक/परिचर यांच्या नियुक्त्या शोधुन काढणे.

३. चौकशीत सकृतदर्शनी आढळून आलेल्या दोषी व्यक्तींची नावे, पदनाम व कालावधी याबाबतची माहिती अहवालात नमुद करणे. चौकशीत पगार पत्रकाचा देखील आधार घ्यावा.

४. यासंदर्भात पोलीस तपास सुरु झालेल्या प्रकरणांचा आढावा घ्यावा व तपासात मागे पडणा-या प्रकरणी तपास यंत्रणेस योग्य निर्देश द्यावेत.

५. गैरव्यवहार/अनियमितता झाल्याचे आढळून आल्यास अशा प्रकारचे गैरव्यवहार/अनियमितता भविष्यात घडणार नाही याबाबत उपाययोजना सुचविणे.

क. चौकशी पथक आवश्यक वाटेल त्या शैक्षणिक संस्थांतील संस्थाचालक/विशेष शिक्षक/परिचर/अधिकारी/कर्मचारी तसेच शालेय शिक्षण विभागातील तसेच विभागाच्या क्षेत्रिय स्तरावरील अधिकारी/कर्मचारी व इतर संबंधीतांना चौकशीसाठी बोलावू शकतील. चौकशीसाठी बोलविण्यात येणा-या व्यक्तीला चौकशी पथकाने मागितलेली माहिती /दस्तावेज उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील. तसेच तपास यंत्रणांनी त्यांच्या तपासकार्याची माहिती विशेष चौकशी पथकास उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

ड. चौकशी पथक आवश्यकतेनुसार दौरे करेल, सदर दौ-यांची व्यवस्था यामध्ये निवास, वाहन व चौकशीसाठी/सुनावणीसाठी जागा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधीत जिल्हाधिकारी यांची राहील. तसेच चौकशी पथकातील सदस्य/अधिकारी/कर्मचारी यांनी केलेला प्रवास खर्च हा त्यांच्या आस्थापना सांभाळणा-या यंत्रणेने करावा.

इ. उक्त विशेष चौकशी पथकासाठी आवश्यक ते अधिकारी व कर्मचारी हे पथकातील पदाधिका-यांनी त्यांच्या आस्थापनेतून उपलब्ध करुन घ्यावेत.

फ़. सदर चौकशी पथकाने त्यांचा अहवाल मा. मुख्य सचिव यांना ६० दिवसांच्या आत सादर करावा.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५२११७४७००२२२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Charushila D Chaudhari

Digitally signed by Charushila D Chaudhari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b99d7dca0e63be1bd1b7158b9523537dcc1d46bc807768647a9ed4ff3816ecf3, cn=Charushila D Chaudhari
Date: 2018.05.22 11:06:16 +05'30'

(चारुशीला चौधरी)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

२) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहाय्यक.
६) सचिव, ग्राम विकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक, बांधकाम भवन, फ़ोर्ट, मुंबई
७) आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी
९) श्री. विशाल सोलंकी, अध्यक्ष, विशेष चौकशी पथक
१०) श्री. जय जाधव, सदस्य, विशेष चौकशी पथक
११) श्री. गिरीश भालेराव, सदस्य, विशेष चौकशी पथक
१२) श्री. श्रीधर शिंत्रे, सदस्य सचिव, विशेष चौकशी पथक
१३) शिक्षण संचालक (प्राथमिक)/(माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
१४) सर्व पोलीस महानिरिक्षक
१५) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
१६) सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक)
१७) निवड नस्ती (टिएनटी-५)